# प्रात्यक्षिक क्रं. ९
# ठसा छपाई आणि साचा छपाई

कापड छपाई करून सुशोभित करण्याची कला ही फार प्राचीन आहे. छपाईच्या अनेक पद्धती आहेत ब्लॉक प्रिटींग आणि स्टेन्सील प्रिटींग ह्या छपाईच्या दोन जुन्या पद्धती असून त्या अजुनही प्रचलित आहेत.

**ठसा छपाई (Block Printing) :** कापड छपाईची ही फार जुनी पध्दत आहे. लाकडी ठोकळ्यांवर आवश्यक किंवा इच्छित नमूना कोरून वापरला जातो. त्यावर डायपेस्ट लावला जातो आणि कापडाच्या नमुन्यावर ठेवला जातो. लाकडी ठोकळ्यांना कापडावर दाब दिल्या जातो. प्रत्येक नमुन्यासाठी हीच पद्धत पुन्हा पुन्हा वापरली जाते. ही बराच वेळ लागणारी व मेहनतीची प्रक्रिया आहे परंतु तीचे परिणाम सुंदर दिसतात.

**आवश्यक साहित्य / सामग्री :** कापडी उत्पादन छपाई करणे : पुढीलपैकी कोणतेही एक

| | |
|---|---|
| टी-शर्ट | गादीचे कव्हर |
| कुर्ती | उशीची अभ्रे |
| दुपट्टा | टेबल क्लॉथ |
| शर्ट | हँन्ड बॅग |

कोरीव लाकडी ब्लॉक, फॅब्रिक रंग, रंग ब्रश, जाडे कापड, जुने वृत्तपत्र.

**पद्धती :** घालायचे कापड किंवा घरगुती वस्तू ज्याची छपाई करावयाची आहे. ती धुतलेली, वाळविलेली आणि इस्त्री केलेली असावी. ती जाड्या कापडावर पसरवावी की ती मागे आधार देऊ शकेल. त्यानंतर जुने वृत्तपत्र पसरवावे आणि ज्या वस्तुची छपाई करावयाची आहे त्यावर एक थर टाकावा. उदा. जर टि-शर्ट किंवा कुर्ती असेल तर मात्र मागच्या आधारासाठी जाड कापड किंवा वृत्तपत्र म्हणजें पुढे आणि कापडाच्या मागच्या बाजूला असावे.

छपाईच्या ब्रशने कोरलेल्या लाकडी ठोकळ्यानंतर (Block) फॅब्रिक रंग लावावा आणि त्यानंतर वस्तूच्या इच्छित भागावर दाब द्यावा जेणेकरून रंग आणि नमूना त्या कापडावर छापल्या जाईल. ही प्रक्रिया इच्छेनूसार पुन्हा पुन्हा करू शकता. कापडावरील कव्हर सुकू द्यावा आणि त्यानंतर ती वस्तू वापरण्यासाठी तयार होईल.



चित्र क्र. ९.१ : कोरीव लाकडी ठोकळा



चित्र क्र. ९.२ : ठसा छपाई

**साचा छपाई (Stencil Printing) :** कापड छपाईच्या पद्धती पैकी ही एक जुनी पद्धती आहे. येथे स्टेन्सील कार्ड पेपर किंवा पातळी धातूच्या पट्टीवर नमुना तयार करून केल्या जातो. स्टेन्सील पृष्ठ भागावर छपाईसाठी ठेवली जाते. स्टेन्सील वर 'डाय'लावला जातो की ज्यामुळें रंग फक्त कापडापर्यंत पोहचेल कि जो कापलेला आहे. त्यानंतर स्टेन्सील काळजीपूर्वक काढुन घ्यावा. आणि जिथे पाहिजे त्या ठिकाणी दुसऱ्या जागेवर ठेवावा.

**आवश्यक साहित्य :** कापडी उत्पादनासाठी छपाई करणे – पुढील कोणतेही एक :

| | |
|---|---|
| टी-शर्ट | गादीचे कव्हर |
| कमीझ | उशीचे अभ्रे |
| ओढणी | टेबल क्लॉथ |
| शर्ट | हॅण्ड बॅग |

**साहित्य/ सामग्री :** ॲक्रलिक शीट, धारदार चाकु/ पेपर कटर / रेडीमेड स्टेन्सील, फेब्रिक रंग, पेंट ब्रश, स्पंज, जाड कापड, जुने वर्तमान पत्र, यु-पिन्स, वजन.

**पद्‌धती :** परिधान किंवा घरगुती वस्तु ज्यांची छपाई करायची आहे ती धुऊन सुकवून आणि इस्त्री केलेली असावी. ती जाड कापडावर पसरवून मागच्या बाजूला आधार देईल अशी ठेवावी. यानंतर जुने वर्तमानपत्र पसरवावे आणि रंगविणाऱ्या कापडावर किंवा वस्तूवर एक थर टाकावा. उदा. जर ते टि-शर्ट किंवा कुर्ती असेल तर मागून जाड कपड्याचा आधार द्या किंवा कपड्याच्या मागे किंवा पुढे मध्यात वर्तमानपत्र ठेवा.

स्टेन्सील तयार करण्यासाठी ॲक्रिलिक शीटवर कटरच्या साह्याने नमुना तयार करा. किंवा तयार स्टेन्सील ही वापरू शकता. कापडाच्या पृष्ठ भागावर स्टेन्सील काळजीपूर्वक ठेवा आणि युपिन्स लावा किंवा कोणत्याही प्रकारचे वजन त्याच्या कोपऱ्यावर ठेवा जेणेकरून स्टेन्सील एका जागेवर राहिल. पेंट ब्रश किंवा स्पंजच्या मदतीने रंग स्टेन्सीलच्या कापलेल्या भागावर लावा. त्यानंतर स्टेन्सील काळजीपूर्वक काढून घ्या. स्वच्छ पुसून टाका आणि पुन्हा वापरू शकता. रंग सुकू द्या आणि आता तुमची वस्तू वापरासाठी तयार झाली.





चित्र क्रं. ९.३ : स्टेन्सील





चित्र क्रं. ९.४ : स्टेन्सील छपाई